RNI No. MAHBIL/2009/35530

प्रा.१ प्रा.१२

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष ६, अंक १४(४)] बुधवार, मार्च १८, २०२०/फाल्गुन २८, शके १९४१ [पृष्ठे २, किंमत : रुपये २३.००

असाधारण क्रमांक २४

## प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.

अनुक्रमणिका

| | पृष्ठे |
|---|---|
| **सन २०२० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६.**—महाराष्ट्र विधानमंडळाच्या सदस्यांचे वेतन व भत्ते अधिनियम यात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम . . . . . . | १-२ |

दिनांक १८ मार्च २०२० रोजी माननीय राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**राजेन्द्र ग. भागवत,**
सचिव (विधि विधान),
महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

---

**सन २०२० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६.**

(मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर "**महाराष्ट्र शासन राजपत्रात**" दिनांक १८ मार्च २०२० रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**महाराष्ट्र विधानमंडळाच्या सदस्यांचे वेतन व भत्ते अधिनियम यात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम.**

१९५६ चा ४९. **ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र विधानमंडळाच्या सदस्यांचे वेतन व भत्ते अधिनियम यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या एकाहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र विधानमंडळाच्या सदस्यांचे वेतन व भत्ते (सुधारणा) अधिनियम, २०२०, असे म्हणावे. संक्षिप्त नाव व प्रारंभ.

(२) तो, दिनांक १ जानेवारी २०२० पासून अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

सन १९५६ चा अधिनियम क्रमांक ४९ याच्या कलम ६ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र विधानमंडळाच्या सदस्यांचे वेतन व भत्ते अधिनियम याच्या कलम ६ मधील, पोट-कलम (५) नंतर, पुढील पोट-कलम जादा दाखल करण्यात येईल :— १९५६ चा ४९.

" (६) महाराष्ट्र विधानमंडळाच्या सदस्यांचे वेतन व भत्ते (सुधारणा) अधिनियम, २०२० याच्या प्रारंभाच्या दिनांकापासून, प्रत्येक सदस्य, वाहनचालकाची सेवा मोफत मिळण्यास हक्कदार असेल. या प्रयोजनासाठी, सदस्यास, वैध वाहनचालन अनुज्ञप्ती (लायसन) धारण करणाऱ्या आणि जिचे वय वर्षे साठ पूर्ण झालेले नाही, अशा कोणत्याही व्यक्तीची, वाहनचालक म्हणून नियुक्ती करता येईल. अशा प्रकारे नियुक्त केलेल्या वाहनचालकास, शासनाने, वेळोवेळी काढलेल्या आदेशाद्वारे विनिर्दिष्ट करता येईल, असे ठराविक वेतन दरमहा मिळेल.". सन २०२० चा महा. १६.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.

प्र ८२

RNI No. MAHENG/2009/35528

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग आठ

वर्ष ६, अंक १७(४)] बुधवार, मार्च १८, २०२०/फाल्गुन २८, शके १९४१ [पृष्ठे २, किंमत : रुपये २७.००

असाधारण क्रमांक ४१

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि विधि व न्याय विभागाकडून आलेली विधेयके (इंग्रजी अनुवाद).**

In pursuance of clause (*3*) of article 348 of the Constitution of India, the following translation in English of the Maharashtra Legislature Members' Salaries and Allowances (Amendment) Act, 2020 (Mah. Act No. XVI of 2020), is hereby published under the authority of the Governor.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

RAJENDRA G. BHAGWAT,
Secretary (Legislation) to Government,
Law and Judiciary Department.

---

### MAHARASHTRA ACT No. XVI OF 2020.

*(First published, after having received the assent of the Governor in the "Maharashtra Government Gazette", on the 18th March 2020.)*

An Act further to amend the Maharashtra Legislature Members' Salaries and Allowances Act.

XLIX of 1956. WHEREAS it is expedient further to amend the Maharashtra Legislature Members' Salaries and Allowances Act, for the purposes hereinafter appearing; it is hereby enacted in the Seventy-first Year of the Republic of India as follows :—

Short title and commencement.

**1.** (*1*) This Act may be called the Maharashtra Legislature Members' Salaries and Allowances (Amendment) Act, 2020.

(*2*) It shall be deemed to have come into force with effect from the 1st January 2020.

Amendment of section 6 of XLIX of 1956.

**2.** In section 6 of the Maharashtra Legislature Members' Salaries and Allowances Act, after sub-section (*5*), the following sub-section shall be added, namely :— XLIX of 1956.

"*(6)* With effect from the date of commencement of the Maharashtra Legislature Members' Salaries and Allowances (Amendment) Act, 2020, every Member shall be entitled, free of charge, to the service of a Driver. For this purpose, the Member may appoint any person, possessing valid driving licence and who has not attained the age of sixty years, as a Driver. The Driver so appointed shall receive such fixed salary per month, as may be specified by order issued by the Government, from time to time.". Mah. XVI of 2020.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.